facebook - navprahar2023 | navprahar2023 | navprahar2023@gmail.com | www.navprahar.com

साप्ताहिक
# नव प्रहार
भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

मुख्य संपादक : - संजय पांडे | मो.८५५२९५८५५५ | navprahar2023@gmail.com

रविवार 29 फेब्रुवारी 2024 | Digital edition | RNI Regn no. MAHBIL/2013/54875 Post Regd. No. ATI/RNP/3337/2022-2024

*जाहिरात*
या ठिकाणी आपल्या प्रतिष्ठानाची (दुकानाची) जाहिरात करा. आणि लाखो ग्राहकांपर्यंत पोहोचा . शुल्क - ५००० ( पाच हजार ) रुपये. ( वर्तमान पत्रात सुध्दा जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल. )

# पूर्णा नदीचे वस्त्रहरण

## म्हैसाग, करतखेड भागातील रेती माफियांची सेटिंग

दिवसः सर्वसाधारण.... वेळ: रात्री 11 वाजता...एका रेती तस्कर याचा मोबाईलचा फोन अचानक खणखणतो.... रेतीवाले भाऊ फोन रिसिव्ह करतात.... पुढून आवाज येतो... " ट्रॅक्टर कुठे आहे ?"इकडून उत्तर मिळते, "घाटातून निघत आहे." फोन करणारा व्यक्ती घाईघाईत.... "भाऊ... ट्रॅक्टर थोडे थांबवा ! अर्धा तासाने साहेब दौऱ्यावर निघणार आहे." आणि माहिती देणारा फोन ठेवतो...रेती व्यवसायिक लगेच 4-5 सहकार्यांना फोन करतो व आदेश देतो. साहेबांचे घर आणि ऑफिसच्या ( पोलीस स्टेशन ) गेटपासून ते शहरातून निघणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर नजर ठेवा. आपले प्रत्येक खबरी ऍक्टिव्ह करा. साहेब कोणत्या मार्गाने जाणार? कधी जाणार? कुठे जाणार? काय कामासाठी जाणार? किती वेळ थांबतील? परत किती वाजता येणार? या सर्व कार्यक्रमाची बितंबातमी द्या.हा प्रसंग रेतीमाफियाशी संदर्भात आहे. यात रेती तस्करांना माहिती पुरवणारा खुद्द अधिकाऱ्यांचा वाहन चालक आहे. अधिकारा-याचा चालकच रेती तस्करांना सर्व माहिती पुरवत असल्याने रेती तस्करांचे चांगलेच फावत असून शासनाला मात्र चांगलाच चुना लागत आहे.सदर कर्मचारी गाडीत बसण्यापूर्वी कॉल करून तर नंतर मिसकॉल किंवा एसएमएस करून



### अधिकाऱ्यांचे वाहन चालक बनले रेती तस्करांचे खबरी

अधिकाऱ्यांच्या प्रत्येक मूव्हमेंटची माहिती रेती व दारू तस्करांना पोहचवतो. या 'वफादारी'च्या मोबदल्यात प्रत्येक रेती तस्कर ड्रायव्हर महाशयाला महिन्याकाठी ठराविक रक्कम व ओली पार्त्या देतात. शासकिय वाहनाचा हा चालक दर महिन्याला तब्बल एक लाख रुपयांपर्यंत पदरी पाडत असल्याची खमंग चर्चा दर्यापूर तालुक्यात, व बोरगाव म्हणजे पोलीस स्टेशन हद्दीत सुरु आहे.दर्यापूर उपविभागातील महसूल व अकोला जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांच्या वाहन चालकांचे मोबाईल कॉल डिटेल काढल्यास अवैध व्यवसायिकांसोबत त्यांचे अर्थपूर्ण संबंध पूर्णपणे उघड होईल. विशेष म्हणजे अधिकाऱ्यांचे वाहन चालकांची वर्षोनुवर्षे एकच ठिकाणी नियुक्ती असल्यामुळे अधिकारी कोणताही येवो त्यांना फरक पडत नाही.उपविभागातील दर्यापूर व अकोला जिल्ह्यातील बोरगाव पोलीस हद्दीतील.



सुरज देशमुख
मो.9325202959

म्हैसाग तर तर येवदा पोलीस स्टेशन हद्दीतील करतखेड रेती तस्करांना प्रशासनाकडून मोकळीक दिल्याचे चित्र मागील तीन महिन्यापासून बघायला मिळत आहे. ट्रॅक्टर पकडून दंडात्मक कारवाईसुद्दा करण्यात आली. मात्र आता बिना रॉयल्टी रेतीचे ट्रॅक्टर गाव शहरामध्ये रिकामे होत असताना प्रशासन डोळे झाकून बसला आहे.महसूल खात्यामध्ये व येवदा पोलीस स्टेशन. बोरगाव मंजू पोलीस स्टेशन महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या जेवढे चालक आहे त्यांचे. जर फोन. चेक केले तर. अधिकाऱ्यांना समजेल की कुंपणच शेत खाते. दर्यापूर तालुक्यातील व अकोला जिल्ह्यातील सीमेला पूर्णा नदीचे वस्त्रहरण करायला कारणीभूत हे रेती तस्कर आहेत. व यांना खतपाणी घालणारे. संबंधित अधिकाऱ्यांचे ड्रायव्हर. सुद्धा या मध्ये सहभागी असल्याची चर्चा सुरू आहे.

### कुंपणच शेत खात असल्याने रेड फेल



**रेती तस्करी वर नियंत्रण मिळविण्यासाठी महसूल व पोलीस अधिकारी अनेकदा रेती घाटापर्यंत शासकीय वाहनांने पेट्रोलिंग करतात. क्वचित प्रसंगीच त्यांच्या हाती अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर व चालक सापडतात. याचे कारण तेच आहे. कारण त्यांना बहुतांश वेळा टीप मिळाल्यामुळे अधिकाऱ्यांना रिकामे हाताने परतावे लागते. महसूल व पोलीस विभागामध्ये शासनाकडून पगार घेऊन रेती माफियांसाठी कर्तव्य बजावणाऱ्या झारीतील शुक्राचार्यमुळे चांगल्या अधिकाऱ्यांची कोंडी होत आहे.**

# खा.नवनीत राणा यांच्या जात प्रमाण पत्रावरील सुनावणी पूर्ण

**अमरावती / प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशा विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या खा. नवनीत राणा यांच्या जात प्रमाण पत्रावरील सुनावणी 28 फ्रब्रुवारीला पूर्ण झाली. न्यायाधीशांनी हे प्रकरण आता निकालासाठी ठेवले आहे. या प्रकरणात काय निकाल|लागतो याकडे अमरावती जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे. अनुसूचीत जातीसाठी आरक्षित असलेल्या अमरावती लोकसभा मतदारसंघातून नवनीत राणा यांनी सलग दोनदा निवडणूक लढविली आहे. गत निवडणूकीत त्या विजयी झाल्या. ज्या जात पडताळणी प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी निवडणूक लढविली ते बोगस असल्याचा आरोप करून तत्कालीन खा. आनंदराव अडसुळ यांनी न्यायालयात धाव घेतली होती. प्रदीर्घ सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने नवनीत यांचे प्रमाणपत्र बोगस असल्याचे सांगून ते रद्द केले होते. 2021 साली आलेल्या या निकालाच्या विरोधात नवनीत यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली होती.तेव्हापासून या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. तारखांवर तारखा, युक्तीवाद असा प्रवास या प्रकरणाचा झाला. अखेर न्यायाधीश जे. के. माहेश्वरी व न्यायाधीश संजय करोल या दोन सदस्यीय खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्याची बुधवारी घोषणा करून निकाल जाहीर केला जाईल असे सांगितले. त्यांनी नेमकी तारीख दिलेली नाही. आता या प्रकरणाचा



काय निकाल येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण, हे प्रकरण संपूर्ण राज्यात गाजले आहे. बुधवारी न्यायालयात नवनीत यांच्याकडून ॲड. धुर्व मेहता तर विरोधी बाजूने ॲड. फरासत व ॲड. सचिन थोरात यांनी बाजू मांडली.



# क्या ऊस नासपीटेनेअपने मकान तथा घर के उपर लगानी चाहिए भाउ साहब की तस्वीर

## चंद रुपये का चंदा देनेवाले इस शक्स ने लगा रखे है अपने नाम के बोर्ड

धामनगाव रेल्वे / **विशेष संवाददाता**

समाज मे या किसी सार्वजनिक काम के लिए चंदा देनेवाले अपने नाम का बोर्ड लगाकर वाहवाही लुटने का प्रयास करते है फिर जिस शक्स के रहमोकरम पर 'लव्हचंद ' ने अब्जो की प्रॉपर्टी जमा रखी है उसने अपनी दुकान तथा मकान पर भाउ साहब का फोटो लगाना चाहिए ऐसा सुझाव शहर के कई नागरिको द्वारा दिया जा रहा है. समाज मे या किसी सार्वजनिक काम के



लिए चंद रुपयों का चंदा देनेवाले कुछ कथित सेठ उस जगह अपने नाम का बोर्ड लगाने के लिए कहते है. या यूं कहें कि नाम का बोर्ड लगाने के शर्त पर ही यह

चंदा देते है. अगर इसमे कुछ कमज्यादा हो जाए तो इनका पारा सातवे आसमान पर पहुंच जाता है. उस नासपीटे ने दुकान तथा घर मे लगानी चाहिए 'भाउ साहब ,' की तस्वीर - दिवंगत भाउ साहब फडके के लगभग 25 से 30 साल पहले करोड़ो रूपये डकार चुके ' लव्हचन्द ' ने अपना तामझाम खड़ा किया है. इन करोड़ो रुपयों के बदौलत यह आज यह शक्स अब्जो

# ' पखाले ' साहेब वाळू तस्कर पळाले की ' ..ल्ले '

## नायब तहसीलदार पखाले यांची रायपूर कासारखेड येथे धाड , पण कारवाई गुलदस्त्यात

**धामणगाव रेल्वे / प्रतिनिधी**

तहसीलदार यांना बदलीचे वेध लागल्याने त्याचे तहसील मध्ये होत असलेल्या बाबींकडे दुर्लक्ष होत आहे. याचाच फायदा नायब तहसीलदार आणि काही खाजगी लोकांकडून उचलल्या जात आहे. नुकतेच नायब तहसीलदार वसंत पखाले यांनी तालुक्यातील रायपूर कासारखेड येथे धाड टाकली पण काय कारवाई झाली हे गुलदस्त्यात आहे. त्यामुळे या प्रकरणातील संभ्रम आणखी वाढला आहे. तहसीलदार गोविंद वाकोडे यांना बदलीचे वेध लागल्याने आणि कण्यारत्नाच्या आगमनामुळे हर्षित असल्याने व वारंवार गावी जात असल्याने



तालुक्यात सुरू असलेल्या अवैध कामाकडे त्यांचे दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे. याचाच गैरफायदा नायब तहसीलदार आणि काही खाजगी लोकांकडून उचलल्या जात आहे. पखाले यांची धाड पण कारवाई गुलदस्त्यात - सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार नायब तहसीलदार हे

त्यांना त्यांच्या सूत्रा कडून मिळालेल्या माहिती प्रमाणे रायपूर कासारखेड येथे पोहचले होते. पण त्यांच्या मते त्यांना पाहताच वाळू तस्करांनी ट्रॅक्टर मधून वाळू खाली करून टाकली. रिकाम्या ट्रॅक्टर वर कारवाई करणे हणजे स्वत:चे हात बांधून घेण्याचा प्रकार असल्याचे त्यांचे मत आहे. वाळू तस्कर पळाले की आपण ' ... ल्ले ' - सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार एनटी साहेब जेव्हा घटनास्थळावर पोहचले तेव्हा दोन ट्रॅक्टर तीन चतुर्थांश वाळू ने भरले होते. पखाले साहेबांनी मनावर घेतले असते तर नक्कीच कारवाई झाली असती. पण सदरची कारवाई घेऊन देऊन सेटल झाल्याचे बोलल्या जात आहे.

# ठाणा (पे.पंप.)येथे पूर्व सैनिक परिवार मेळाव्याचे आयोजन





शहीद अजय महामे स्मृती सार्वजनिक वाचनालय ठाणा पेट्रोलपंप येथे माजी सैनिक परिवार मेळाव्याचे आयोजन पूर्व सैनिक संघटनेकडून करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पोलिस अधीक्षक भंडारा, लोहित मतानी हे होते. आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या हस्ते शहीद शिपाई अजय मडामे स्मारकाच्या प्रांगणात सैनिक सांस्कृतिक सभागृह बांधकामाचे भूमिपूजन पूर्व सैनिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे करण्यात आले. सुरुवातीस शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद स्मारक व शहिदांना मानवंदना देऊन राष्ट्रगीत म्हणण्यात आले. तसेच भारत मातेच्या जयघोषाने संपूर्ण परिसरात स्फूर्तीदायक वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी सरपंच पुरुषोत्तम कांबळे, २०६, कोब्रा बटालियनचे मुख्य मार्गदर्शक रोहित कुमार, हिमशिखर दुरत मीरा, अप्पर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, अॅड. किशोर लांजेवार, ठाणेदार सुधीर बोरकुटे, सुभाष वाडीभस्मे, दीनदयाल देशभ्रतार, चंद्रशेखर गिरडे, शशिकांत भोयर, प्रकाश पारधी, विकी डोईफोडे, सुधाकर लुटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.मेळाव्याप्रसंगी नृत्य स्पर्धा आणि सैनिक पाल्यांच्या स्पर्धा, यासह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शालेय परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या पूर्व सैनिकांच्या पाल्यांचा पूर्व सैनिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

# मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे बेरोजगार युवक युवतींना रोजगार मिळावा


## उद्योग मंत्री उदय सामंत यांना महेश भैया डोंगरे पाटील यांचे निवेदन

**बुलढाणा प्रतिनिधी -**

मातृ तीर्थ शिनखेड राजा येथील परिसरातील युवक युवतींना बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी एमआयडीसी (MIDC) उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा. याकरिता काल दिनांक 28 फेब्रुवारी मुंबई इथे उद्योग मंत्री उदय सामंत यांना मराठा समाजाचे नेते महेश भैया डोंगरे पाटील यांनी निवेदन सादर केले. सदर निवेदनात म्हटले आहे की.मातृतीर्थ सिंदखेड राजा शहराचा स्वतंत्र परिचय देण्याची गरज नाही, परंतु ज्या शहराने स्वराज्याची प्रेरणा दिली तेथील विकासाचा अनुशेष कायमच वाढत चालला आहे. शहरातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागावे यासाठी आम्ही सरकार दरबारी प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. शहर विकासाच्या दृष्टीकोनातून युवक युवतींना बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी तरुण



मुलामुलींना त्यांच्या पायावर उभ करण्यासाठी हाताला काम मिळाल्यानंतर नशापाणी पासून प्रवृत्त करण्यासाठी व भावी आयुष्य सुरळीत व चांगले जाण्यासाठी त्यांच्या हाताला काम देणे महत्वाचे आहे. त्याकरिता सिंदखेड राजा शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर एमआयडीसी (MIDC) उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा, असे विनंतीपूर्वक निवेदन सादर करण्यात आले. गेल्या जिजाऊ जन्मोत्सव दिनानिमित्त मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे महेश भैया यांनी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत. त्यांनी सिंदखेड राजा येथील बेरोजगार युवकांना व युवतींना रोजगार सिंदखेड राजा नगरीत उपलब्ध करून देईल असे आवाहन. केले होते. त्यासंदर्भात त्यांनी काल उद्योग मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी सकारात्मक चर्चा करून. मंत्री महोदयांनी संबंधित विषयात जातीने लक्ष देऊन संबंधित विभागाला बैठक लावण्याच्या सूचना दिल्या


जय जिजाऊ जय शिवराय जय शंभूराजे
महेश डोंगरे पाटील
प्रति,
मा.ना.श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई - ३२
विषय - सिंदखेड राजा शहर व परिसरातील युवक युवतीना बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी एमआयडीसी (MIDC) उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा.
महोदय,
मातृतीर्थ सिंदखेड राजा शहराचा स्वतंत्र परिचय देण्याची गरज नाही, परंतु ज्या शहराने स्वराज्याची प्रेरणा दिली तेथील विकासाचा अनुशेष कायमच वाढत चालला आहे. शहरातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागावे यासाठी आम्ही सरकार दरबारी प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. शहर विकासाच्या दृष्टीकोनातून युवक युवतीना बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी तरुण मुलामुलींना त्यांच्या पायावर उभ करण्यासाठी हाताला काम मिळाल्यानंतर नशापाणी पासून प्रवृत्त करण्यासाठी व भावी आयुष्य सुरळीत व चांगले जाण्यासाठी त्यांच्या हाताला काम देणे महत्वाचे आहे. त्याकरिता सिंदखेड राजा शहरामध्ये मोठ्या प्रमाणात (MIDC) उभारून त्यांच्या हाताला रोजगार द्यावा, हि आपणास नम्र